

# प्राचार्य श्रीमंतराव भोसले प्रतिष्ठाण, निरा

**ता. पुरंदर, जि. पुणे ४१२१०२  रजिस्ट्रेशन क्रमांक : महा/७६४/२०२०/पुणे दि.२२/०९/२०२०**



## आवाहन

प्रिय माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी,

महात्मा गांधी विद्यालय आणि श्रीमती लीलावती रिखवलाल शहा कन्या विद्या मंदिर, निरा

यांना सस्नेह नमस्कार.

आम्ही गेल्या वर्षी कर्मवीर जयंतीला - दि.२२ सप्टेंबर २०१९ रोजी आपल्या महात्मा गांधी विद्यालय, निरा येथे एक स्नेहसंमेलन घेतले होते, त्यावेळी आम्ही सर्वांनी ठरविले होते की आपण ज्या शाळेमध्ये शिकलो त्या शाळेसाठी काहीतरी करावे. आपल्या दोन्ही शाळांच्या शैक्षणिक सुधारणा आणि आर्थिक मदतीसाठी एक ट्रस्ट स्थापन करावा असा विचार त्यातुनच पुढे आला.

### प्राचार्य श्रीमंतराव भोसले प्रतिष्ठाण

प्राचार्य श्रीमंतराव भोसले यांनी १९७६ मध्ये महात्मा गांधी विद्यालयाची सूत्रे हातात घेतली. त्यांनी ताबडतोब शाळेमध्ये शैक्षणिक उपक्रमांची नव्याने आखणी सुरु केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आवश्यक असे महत्वाचे उपक्रम सुरु झाले. प्रयोगशाळा अद्ययावत झाल्या. विशेषतः १० वी मध्ये इंग्रजी आणि गणितात नापास होण्याचे प्रमाण तेव्हा जास्त होते. सकाळी एक्स्ट्रा तास घेऊन अभ्यासावर विशेष भर दिला गेला. हे सर्व करण्यासाठी अर्थातच सर्व शिक्षकांचं सहकार्य आवश्यक. या शिक्षकांमध्ये प्रेरणा निर्माण करायचं कामही भोसले सरानी इतकं उत्कृष्ट केलं की शाळेचं वातावरण बदलून गेलं. १० वीला तेव्हा एक सहामाही आणि एक सराव परीक्षा असे. भोसले सरांनी वर्षात पाच सराव परीक्षा घ्यायला सुरुवात केली. त्यामुळं फायनल SSC परीक्षेचं टेन्शन निघून गेलं. या सर्वांचा परिणाम म्हणून १९७८-७९ च्या बॅचचा रिझल्ट ९१ टक्के लागला. ग्रामीण भागामध्ये तेव्हा ही विशेष अभिमानस्पद घटना होती, कारण सध्याच्या तुलनेमध्ये परीक्षा कठीण असत. यानंतर शाळेनं मागं वळून पाहिलं नाही. आजही आपण शिकलो त्या शाळेचा दर्जा किती चांगला होता याची जाणीव सर्वानाच आहे. आज सरांचे बरेच विद्यार्थी देशामध्ये विविध क्षेत्रांमध्ये उच्च पदांवर कार्यरत आहेत, विविध व्यवसायांमध्ये अग्रेसर आहेत.

भोसले सरांनी कर्मवीरांच्या प्रेरणेनं शिक्षण प्रसाराचा पेशा स्वीकारला होता. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी घरच्या शेतीकडे लक्ष द्यायचं ठरवलं आणि शेतीमध्ये आधुनिकीकरण केलं. आज वयाच्या नव्वदीतही भोसले सर पंढरपूरजवळ सरकोली येथे शेतीमध्ये कार्यरत आहेत.

ट्रस्ट स्थापन करायचा विचार जेव्हा पुढे आला तेव्हा अर्थातच भोसले सरांसारख्या प्रेरणादायी, आदरणीय व्यक्तीच्या नावेच ते करावे असा माजी विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये एकदिलाने निर्णय झाला. त्याप्रमाणे या कर्मवीर जयंतीला - २२ सप्टेंबर २०२० रोजी आपल्याला **'प्राचार्य श्रीमंतराव भोसले प्रतिष्ठाण'** चे रजिस्ट्रेशन मिळाले, हे आपणास कळवताना आम्हाला आनंद होत आहे.

### प्रतिष्ठाण कशासाठी!

या प्रतिष्ठानचा मुख्य उद्देश म्हणजे शाळेतील गरीब आणि हुशार - होतकरू, विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासाठी मदत करणे, शाळेतील काही शैक्षणिक, तांत्रिक गरजा असल्यास त्याची पूर्तता करणे. उदा. आधुनिक प्रयोगशाळा, सामुग्री, संगणक लॅब, इमारत. तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी गेस्ट लेक्चर्स इ.च्या माध्यमातून मार्गदर्शन करणे व नवनवीन शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे असा आहे. हे सर्व करत असताना आपल्याला शाळेचे माजी शिक्षकगण तसेच विद्यमान प्राचार्य, कन्याशाळेच्या प्राचार्या मॅडम तसेच सर्व शिक्षकवृंद यांचे मोलचे सहकार्य लाभत आहे.

### आपण काय करू शकतो !

या शाळांमधून आपण ज्ञानाची शिदोरी घेऊन बाहेर पडलो त्याची अंशत: परतफेड करायची ही नामी संधी आहे. सर्वजण यथाशक्ती आर्थिक मदत करू शकता, तशी सुरुवातही झाली आहे. पण केवळ आर्थिकच नव्हे तर आपली कार्यकौशल्ये, राजकीय, सामाजिक, शासकीय संपर्क अशा सर्व गोष्टींचा या कामासाठी उपयोग आहे. आता सर्व माजी विद्यार्थी/ विद्यार्थिनी तसेच इतर ग्रुपमधील मधील सर्व सदस्यांची खऱ्या अर्थाने गरज लागणार आहे. त्यासाठी आपण सर्वजण वरील विविध माध्यमांतून आपल्या या प्रतिष्ठानला भरीव योगदान देऊन सहकार्य कराल याची खात्री आहे. सोबत ट्रस्टच्या बँक खात्याचा तपशील दिला आहे. चला तर, त्यात योगदान देऊन या चांगल्या कामाला प्रारंभ करूया!

**प्राचार्य श्रीमंतराव भोसले प्रतिष्ठाण, निरा**
बँक : बँक ऑफ महाराष्ट्र, निरा शाखा, जिल्हा पुणे
करंट खाते क्रमांक : **60 37 11 67 448**
IFSC : MAHB0000096

आपले स्नेहांकित,

**सर्व सदस्य, प्राचार्य श्रीमंतराव भोसले प्रतिष्ठाण, निरा**



**प्राचार्य श्रीमंतराव भोसले प्रतिष्ठाण,निरा**
शांती निवास, निरा-बारामती रोड, मु.पो. निरा, ता. पुरंदर, जि. पुणे ४१२१०२. संपर्क : दूरध्वनी: ०२११५०२४२७६३, मो. ९५११७२७३६६ इमेल: infopsbpn@gmail.com